सोलापूर महानगरपालिका,

जा.क्र.सआस/कक्ष-1/आस्था-2/60
सामान्य प्रशासन विभाग
सोलापूर. दि.06/05/2021

-: <u>जाहिर सूचना</u> :-

**अर्ज करण्याची अंतिम दि. 20/05/2021**

विषयः- सोलापूर महागनरपालिके अंतर्गत विवक्षित कामकाजासाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2715/प्र.क्र.100/13, दि.17/12/2016 मधील तरतुदी नुसार कंत्राटी तत्वारील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची सेवा घेणेबाबत.

सोलापूर महानगरपालिके अंतर्गत विवक्षित कामकाजाकरीता शासकीय/निम शासकीय सेवेतून सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2715/प्र.क्र.100/13,दि.17/12/2016मधील तरतुदी नुसार सहा महिनेकरीता तात्पुरत्या स्वरूपात सेवानिवृत्त अधिकारी यांचेकडून सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी अर्ज मागवून त्यांची निवड करून नामिकासूची (Panel) तयार करणेकामी अधिकाऱ्यांनी अर्ज विहित मुदतीत smcgados2@gmail.com या ईमेलवर ( सब्जेक्टमध्ये विवक्षित कामासाठी अर्ज असे नमूद करून ) अर्ज सादर करावेत. याबाबत सविस्तर माहिती सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcoroporation.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**<u>मा.आयुक्त यांचे मान्यतेने</u>**

(जमीर लेंगरेकर)
**<u>उपायुक्त</u>**
**<u>सोलापूर महानगरपालिका,</u>**

सोलापूर महानगरपालिका,

जा.क्र.सआस/कक्ष-1/आस्था-2/60
सामान्य प्रशासन विभाग
सोलापूर. दि.06/05/2021

## -: जाहिर सूचना :-
## अर्ज करण्याची अंतिम दि. 20/05/2021

सोलापूर महानगरपालिके अंतर्गत विवक्षित कामकाजाकरीता शासकीय/निम शासकीय सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी यांची महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण.2715/प्र.क्र.100/13, दि.17/12/2016 मधील व वेळोवेळी पारीत झालेल्या शासन निर्णयातील तरतुदी नुसार सहा महिनेकरीता तात्पुरत्या स्वरूपात सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी अर्ज मागवनू त्यांची निवड करून नामिकासूची (Panel) तयार करणेकामी इच्छुक अधिकाऱ्यांनी अर्ज विहित मुदतीत smcgados2@gmail.com या ईमेलवर ( सब्जेक्टमध्ये विवक्षित कामासाठी अर्ज असे नमूद करून ) अर्ज सादर करावेत

| अक्र. | पदनाम | तपशील / अनुभव | कामाचे स्वरूप | संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | सहाय्यक आयुक्त /खातेप्रमुख/ प्रशासन अधिकारी (गट अ व ब या समतुल्य दर्जाचे अधिकारी) | आस्थापना विषयी सर्व कामकाजाची माहिती व त्या कामाचा सात वर्षाचा अनुभव | प्रलंबित चौकशीचे प्रकरणे, सेवा प्रवेश नियम तयार, आकृतीबंध, त्याअनुषंगाने इतर आस्थापना विषयी कामकाज | 3 (आवश्यकता नुसार कमी/जास्त) |
| 2 | अभियंता / उप.अभियंता / सहा. अभियंता (गट अ व ब या समतुल्य दर्जाचे अधिकारी) | स्थापत्य विषयी सर्व कामकाजाची माहिती व त्या कामाचा पाच वर्षाचा अनुभव | शहरातील नियमित व स्वच्छ पाणी पुरवठा करणेसाठी व ड्रेनेज विषयक कामकाजासाठी | 7 (आवश्यकता नुसार कमी/जास्त) |
| 3 | अभियंता / उप.अभियंता / सहा. अभियंता (गट अ व ब या समतुल्य दर्जाचे अधिकारी) | यांत्रिकी विषयी सर्व कामकाजाची माहिती व त्या कामाचा पाच वर्षाचा अनुभव | शहरातील नियमित व स्वच्छ पाणी पुरवठा करणेसाठी व ड्रेनेज विषयक कामकाजासाठी | 3 (आवश्यकता नुसार कमी/जास्त) |
| 4 | लेखापाल (गट अ व ब या समतुल्य दर्जाचे अधिकारी) | लेखा विषयी सर्व कामकाजाची माहिती व त्या कामाचा पाच वर्षाचा अनुभव | लेखा संदर्भातील विवक्षित काम | 4 (आवश्यकता नुसार कमी/जास्त) |

### अटी व शर्ती :-

1. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण 2715/प्र.क्र.100/13, दि.17/12/2016 मधील अटी व शर्ती लागू राहतील. तसेच नेमण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांचे मासिक परिश्रमिक/मानधन उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे करण्यात येईल.
2. सेवानिवृत्त अधिकारी यांचे वय 65 कमी असावे किंवा त्यापेक्षा कमी असणाऱ्यांना प्राधान्य राहिल.
3. सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच त्यांचेविरूध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी, किंवा चौकशी प्रकरणी शिक्षा झालेली नसावी.

4. करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.
5. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबध (conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहील.
6. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.
7. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सहा महिनेकरीता सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.
8. सदरची सेवा ही फक्त 3 वर्षाच्या मर्यादेकरीताच राहणार आहे. तथापी नेमण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीमधील कामकाजाचे मुल्य मापन करून कामकाज उत्कृष्ठ असल्यावरच त्यांना पुढे मुदतवाढ देण्याबाबत विचार करण्यात येईल.
9. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.
10. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितांस शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे /सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

मा.आयुक्त यांचे दि.19/04/2021
रोजीची मान्यतेने

(जमीर लेंगरेकर)
**उपायुक्त**
**सोलापूर महानगरपालिका,**